उपसंचालक,आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ औरंगाबाद या कार्यालयातील १७ अस्थाई पदे पुढे चालु ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.१०१/आरोग्य-४

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१.
तारीख: २० एप्रिल, २०१८.

<u>वाचा</u>

१) सहसंचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र, क्र.संआसे/आस्था/कक्ष-५/ टे-५/१७ अपदे/१५४३-४४/२०१८, दि.७.०४.२०१८.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः अपदे-२०१७/प्र.क्र.२५/आरोग्य-४, दि.१४.०२.२०१८.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.५.०३.२०१८.

<u>शासन निर्णय</u>

उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळाच्या औरंगाबाद या कार्यालयातील १७ अस्थाई पदांना संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.१४.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ औरंगाबाद या कार्यालयातील यासोबत जोडलेल्या विवरणपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या १७ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

१) उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.
३) विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

सदर पदांवरील होणारा खर्च, मागणी क्रमांक आर-१ मधील मुख्य लेखाशीर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ००१-संचालन व प्रशासन, (०१)(०२)- प्रादेशिक कार्यालये (२२१० ०३५१)” व “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ००१-संचालन व प्रशासन, (०१)(०८)-प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामीण रुग्णालयाइतका दर्जा वाढविणे (२२१० ०४१३)” या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता मंजुर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०४१२२४५६७८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.04.20 12:23:12 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, प्रा.आ.केंद्र (जि.प.स्तर), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद.
६. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
७. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (लेखा व लेखापरिक्षा), पुणे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद
९. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, औरंगाबाद
११. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३ / अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य- ४).

उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मडंळ कार्यालयातील १७ अस्थाई पदे सन २०१८ - २०१९ वर्षासाठी पुढे चालू ठेवण्याबाबत प्रस्ताव.

दिनांक ०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ पर्यंत

विवरण पत्र अ

अ.क्र	तात्पुरते पद ज्या शासन निर्णयाद्वारे निर्माण केले त्याचा शा. नि.क्र. व दि.	पदनाम	पदांची संख्या	वेतनश्रेणी सुधारित	ज्या शासन निर्णयाद्वारे पद पुढे चालू ठेवण्यात आले तो शा.नि.क्र. व दि.	ज्या दिनांका पासुन पदे पुढे चालू ठेवावयाची आहे तो दिनांक	लेखा शिर्ष	पदे पुढे चालू ठेवणे बाबत समर्थन.
१	२	३	४	५	६	७	८	९
१	सा.आ.वि.क्रं. डीएचएस-१०८३/ २४२/पीएच-१४ दि.२/५/८३	सहाय्यक संचालक वर्ग-१	१	१५६००-३९१००(६६००)	सा.आ.वि.शा.नि.क्रं. अपदे २०१७ प्र.क्र. २५/आरोग्य-४/ दिनांक १४/०२/१८	१ मार्च २०१८	२२१०-वै.से. व सा. आ., ०६- सार्व. आरोग्य, ००१-(१)-प्रादेशिक विभाग कार्यालय (२२१००३५१)	विभागीय कार्यालय असल्याने मडंळातील आरोग्य संस्थांच्या नियंत्रणाकरिता व आरोग्य सेवा सुरळीत चालविण्यासाठी पदे आवश्यक आहेत.
२		लघुटंकलेखक वर्ग-३	१	५२००- २०२००(२४००)				
३		शिपाई, वर्ग-४	१	४४४०- ७४४००(१३००)				
४	सा.आ.वि.क्रं.पदआ २००७/ प्र.क्र.११७/ सेवा-१/ दि.६/८/०७	अधिक्षक, वर्ग-३	१	९३००- ३४८००(४३००)				
५		वरिष्ठ लिपीक, वर्ग-३	५	५२००- २०२००(२४००)				
६		कनिष्ठ लिपीक, वर्ग-३	५	५२००- २०२००(१९००)				
७		वाहन चालक	१	५२००- २०२००(१९००)				
८		दुरध्वनी चालक	१	५२००- २०२००(२०००)				
९		औषध निर्माण अधिकारी / औषध निर्माता/ मिश्रक	१	५२००- २०२००(२८००)				
		एकूण	१७					